(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

रमेशचंद्र तिवारी आणि आणखी एक

विरुद्ध

यु.पी. अवास व विकास परिषद, लखनौ आणि इतर

८ जानेवारी १९९६

[ न्यायमूर्ती के. रामास्वामी आणि न्यायमूर्ती जी. बी. पट्टनाजक, ]

भूसंपादन कायदा, १८९४/उत्तर प्रदेश आवास व विकास परिषद अधिनियम, १९६५: कलम ६, २८, ३२ आणि ५५ आणि अनुसूचीच्या परिच्छेद २ सह भूसंपादन कायद्याच्या अधिनियम कलम ६ अन्वये सुरू केलेले संपादन- मानण्यात येते की भूसंपादन कायद्याचे कलाम ६ लागू नाही -

कलम २८ आणि ३२ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती कलम ५५ च्या अंमलबजावणीद्वारे सुधारित अधिनियमाच्या अनुसूचीच्या परिच्छेद २ सह लागू आहे-तसेच १९८४ चा भूसंपादन (सुधारणा) अधिनियम ६८ लागू नाही - कायद्याच्या कलम २८ अन्वये अधिसूचना जारी आणि अधिनियमच्या कलम ३८ अन्वये केलेल्या घोषणेनुसार कायद्याच्या कलम ३२ अन्वये नुकसान भरपाईसाठी वैध-दावेदार पात्र होते.

गौरी शंकर गौर आणि इतर विरुद्ध उत्तर प्रदेश आणि इतर राज्य, [१९९४] १ एससीसी ९२ आणि उत्तर प्रदेश आवास व विकास परिषद, लखनौ विरुद्ध लता अवस्थी, [१९९५] ३

एससीसी ५७३ चा आधार घेतला.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक १८२३/१९९६.

सी.एम.डब्ल्यू.पी.क्र.९२९५/१९८४ मधील अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या दि. ३.१०.८५ च्या निर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी - योगेश्वर प्रसाद, महाधिवक्ता पी. के. बजाज आणि रचना गुप्ता

उत्तरवादींसाठी रेणू जॉर्ज आणि पी.के. जैन

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आला :

परवानगी मंजूर.

या प्रकरणात उपस्थित केलेला वाद पूर्णपणे सर्वोच्च न्यायालयाच्या “गौरी शंकर गौर आणि इतर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर, [१९९४] एससीसी ९२” मधील पारित केलेल्या निकालाने व्यापला आहे. या न्यायालयाने असे म्हटले होते की भूसंपादन कायदा, १८९४ च्या कलम ६ मधील तरतुदी उत्तर प्रदेश आवास व विकास परिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत सुरू केलेल्या संपादनास आणि कलम २८ आणि ३२ मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेस लागू होत नाहीत, अनुसूचीच्या परिच्छेद २ सह कलम ५५ च्या अंमलबजावणीद्वारे सुधारित केल्याप्रमाणे लागू होईल. परिणामी, १९८४ च्या भूसंपादन (सुधारणा) कायदा ६८ चा कोणताही उपयोग झाला नाही. उत्तर प्रदेश आवास व विकास परिषद, लखनौ विरुद्ध लाला अवस्थी, [१९९५] ३ एससीसी ५७३ या खटल्यात या न्यायालयाने वरील मताचा पुनरुच्चार केला. परिणामी, कलम २८ अन्वये जारी केलेली अधिसूचना आणि अधिनियमच्या कलम ३८ अन्वये केलेली घोषणा कायद्याने वैध आहे. अधिनियमअंतर्गत विहित केलेली कार्यपद्धती

प्रबळ असावी. १९८४ चा सुधारणा कायदा ६८ अधिनियमअंतर्गत अधिग्रहणाला लागू होत नाही. तथापि, गौरी शंकर च्या खटल्याचा निकाल (उपरुल्लेखित) लक्षात घेता, दावेदारांना घोषणेच्या तारखेच्या संदर्भात निश्चित केलेल्या नुकसान भरपाईचा हक्क त्यात नमूद केलेल्या कारणांसाठी कायद्याच्या कलम ३२ अन्वये असेल. त्यानुसार अपील निकाली काढले जाते.

अपील निकाली काढण्यात आले.

जी . एन.

************

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*************